वाचले :-

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१
२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब,माघ२९,शके १९४१ दि.१८/२/२०२०
३. पत्र क्र.प्रशा/७/कावि/५५९/२०२० दिनांक २० ऑगस्ट, २०२०
४. पदोन्नती समिती सभा दि.०१/०३/२०२४ चा सभावृत्तांत
५. मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र. ५८३ दि. १२/०३/२०२४ व ठराव क्र. ७३८ दि.०३/१०/२०२४
६. मा.आयुक्त सो यांचा दि. १०/१०/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/६९३/२०२४
दिनांक १०/१०/२०२४

**विषय :- 'कार्यकारी अभियंता(स्थापत्य)' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** अभिनामाची २४ पदे **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** मध्ये शासन मंजूर आहेत. **'कार्यकारी अभियंता (स्थापत्य)'** अभिनामाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०१/०३/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० मधील नियम ६. पदोन्नतीने नेमणूक करणे मधील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम-४५ अंतर्गत येणारी तसेच इतर वर्ग - १ ची पदे पदोन्नतीने भरतांना, त्यांस शासनाची पुर्वमंजूरी आवश्यक राहील अशी अट नमुद आहे. सदरची अट शिथिल करण्याकामी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये शासनास कळविण्यात आलेले आहे. परंतु महापालिका प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विभागाची आवश्यकता विचारात घेता **कार्यकारी अभियंता (स्थापत्य)** पदे सद्यस्थितीत रिक्त ठेवणे योग्य नाही.

यास्तव उपरोक्त नमुद पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व 'उपअभियंता (स्था)' पदावरील खालील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादि सेवाविषयक तपशिल पडताळून तसेच दि.३१/१२/२००७ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीतील क्रम दिनांक २५/०५/२००४ रोजीची स्थिती गृहित धरण्यात येवून पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिका तसेच दिनांक ०७/०५/२०२१ चे शासन निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'कार्यकारी अभियंता (स्था)'** पदावर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीत मा.महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र | उपअभियंता पदावरील अधिका-यांचे नावं | पदवी/पदवीका | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना द्यावयाचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | नरोटे सुनिलदत्त लहानू | पदवी | ज्येष्ठतेनुसार | क क्षेत्रिय स्थापत्य |
| २. | बरीदे महेश वसंत | पदवी | ज्येष्ठतेनुसार | पाणीपुरवठा |

मा.महापालिका सभेच्या आधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी ठराव क्र.५८३, दि.१२/०३/२०२४ व ठराव क्र. ७३८ दि.०३/१०/२०२४ अन्वये उपरोक्त अधिकारी यांना 'कार्यकारी अभियंता (स्था)' पदावर पदोन्नती देण्यास मान्यता दिलेली आहे.

सबब, उपरोक्त नमूद बाबी विचारात घेता, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, स्थापत्य अभियंता संवर्गातील सेवाज्येष्ठता व पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या याचिका क्र.४२०६/२००८, क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९, क्र.१२२४८/२००९, क्र.२२५९/२०१५, क्र.४२३०/२०१८, क्र.४९४६/२०२० आणि मे.आकुर्डी न्यायालय येथे न्यायप्रविष्ट असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे. औद्यो. न्यायालय, पुणे येथे दाखल कंम्प्लेट युएलपी क्र.१७/२०१४ व मा.उच्च न्यायालय मुंबई येथील रिट पिटीशन क्र ११८१७/२०२१ व ३५६२/२०२१ मधील होणारे अंतिम निर्णयाचे अधिन तसेच पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ

असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त नमुद अधिकारी यांना **कार्यकारी अभियंता(स्थापत्य)** अभिनामाचे पदावर **पे.लेवल S-२३ वेतनश्रेणी ६७७००-२०८७००** या वेतनश्रेणीमध्ये ज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात उक्त नमुद केलेल्या सर्व न्यायालयीन दाव्यांच्या अधिन तसेच शासनाने मान्यता देण्याच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासून तात्पुरती पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. सदरच्या पदोन्नतीमुळे उपरोक्त नमूद अधिकारी यांना त्यांचे नावासमोर स्तंभ क्र.५ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कामकाजाकरीता संबंधित विधानसभा मतदारसंघ कार्यालयामार्फत उपरोक्त अधिका-यांच्या यापुर्वी नियुक्त्या करण्यात आल्या असल्यास अथवा भविष्यात नियुक्त्या केल्यास संबधित अधिका-यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचे कामकाज सांभाळून पदोन्नतीच्या पदाची कर्तव्ये पार पाडावीत.**

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित

प्रत-

१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण

३) सर्व संबंधित विभाग ४) प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,